# महाराष्ट्रजीवनप्राधिकरण

सिडकोभवन,दक्षिणकक्ष,२रामजला,बेलापूर,नवीमुंबई.

**दुरध्वनी:** ०२२ - २७५७८४०९ **फॅक्स:** ०२२ - २७५७१६६६


---

जा.क्र.मजीप्रा-२०१९ /का.अ.-प्रतिनि/८४/आ-३/ दिनांक: २३/०७/२०१९.

प्रति,

अधीक्षक अभियंता (आय.टी.कक्ष)
म.नि.सं. व स.कक्ष,मजीप्रा,
सिडको भवन, नवी मुंबई.

**विषय:**-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यासन अधिकारी/ अधीक्षक हे पद प्रतिनियुक्तीने भरणेकरिता जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ** :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्या-१२, दिनांक: १७ डिसेंबर,२०१६.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या-१२, दिनांक: १६ फेब्रुवारी,२०१८.

**महोदय,**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर अधीक्षक/ कार्यासन अधिकारी हि रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याचे प्रस्तावित आहे. सदरहू पद मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी यांचे सहाय्यक कक्ष अधिकारी या संवर्गातील पदामधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येते. सदर पद प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. १७.१२.२०१६ मधील परिच्छेद -६ (१) व १६.२.२०१८ मधील नियुक्तीच्या कार्यपध्दतीमध्ये प्रतिनियुक्तीने पद भरण्यासाठी संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत नमूद केले आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधीक्षक/ कार्यासन अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यासठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार आवश्यक त्या माहितीसह जाहिरातीचा नमुना तयार करण्यात आला असून, सदर नमुना व अधीक्षक / कार्यासन अधिकारी या पदाचे कर्तव्य व जबाबदारी याबाबतचा तपशील सोबत जोडला आहे. करिता सदरची जाहिरात कर्तव्य व जबाबदारीच्या तपशीलासह प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

सोबत: वरीलप्रमाणे

**(अशोक मांडे)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी** (प्र.)

**कार्यासन अधिकारी/ अधीक्षक पदाच्या कर्तव्य व जबाबदारी याबाबतचा तपशील.**

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयात अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबी, न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी व अनुषंगिक प्रकरणे या अनुषंगाने वाटप केलेल्या विषयांबाबत कार्यवाही करणे.

२) प्राधिकरणाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून मध्यवर्ती कार्यालयाकडे मार्गदर्शनासाठी प्राप्त होणा-या सेवाविषयक बाबींवर कार्यवाही करुन अंतिमत: निर्णय देणे.

३) मा.सदस्य सचिव व मा.मुख्य प्रशासकीय अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कामकाज पहाणे.

# जाहिरात

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयातील**

**कार्यासन अधिकारी/ अधीक्षक हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता जाहिरातीचा नमुना.**

| अ.क्र. | तपशील | | |
|---|---|---|---|
| १ | पदाचे नांव | : | कार्यासन अधिकारी/ अधीक्षक |
| २ | पदांची संख्या | : | १ पद |
| ३ | पदाचा प्रतिनियुक्ती कालावधी | : | प्रथमत: १ वर्ष |
| ४ | पदस्थापनेचे ठिकाण | : | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, नवी मुंबई. |
| ५ | ज्या संवर्गात पद भरावयाचे त्या संवर्गाचे नांव | : | मंत्रालयीन विभागातील सहाय्यक कक्ष अधिकारी या पदावर कार्यरत असलेले अधिकारी. |
| ६ | पदाची वेतनश्रेणी | : | वेतन बँड- वेतनश्रेणी (रु.९३००-३४८००) ग्रेड वेतन-४३००/- |
| ७ | अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख | : | जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५दिवसाच्या आत. |
| ८ | अर्ज करावयाचे कार्यालय | : | मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, नवी मुंबई. |